# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### मा.सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींमध्ये दिलेले आरक्षण अवैध ठरविल्यामुळे ओबीसी प्रवर्गातील निवडणूका रद्द झाल्याबाबत

**(१) ८५०४ (१०-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा १९६१ च्या (२)(क) नुसार अन्य मागासवर्गीयांसाठी २७ टक्के आरक्षण लागू करण्यात आले असून सदर आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्याच्या कारणामुळे हे आरक्षण अवैध असल्याचा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य निवडणूक आयोगाने नंदुरबार, धुळे, वाशिम, अकोला, पालघर व नागपूरच्या जिल्हा परिषद व २५ पंचायत समितींमध्ये बीसीसी (मागास प्रवर्ग, ओबीसी व इतर मागास प्रवर्ग) सदस्यांची निवडणूक रद्द करण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक ६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाबाबत दिलेल्या निर्णयानंतर दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी आपल्या दालनात सत्ताधारी व विरोधी पक्षनेत्यांची बैठक आयोजित केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनी आयोजित केलेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर बैठकीत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ४ मार्च, २०२१ रोजीच्या आदेशाविरुध्द पुर्नविचार याचिका दाखल करण्याबाबत एकमत झाले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) निरंक

---

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(२) १५९३४ (२८-१२-२०२२) श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन लागू करून त्यानुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी परिपत्रकाद्वारे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २४ महिने इतका कालावधी होवूनही जिल्ह्यातील बहुसंख्य ग्रामपंचायत कर्मचारी हक्काच्या वेतनापासून वंचित राहिले असल्याची बाब माहे, ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिपत्रकाची अंमलबजावणी करून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन देण्यास कसूर करीत असलेल्या ग्रामपंचायतींची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन श्रेणी तातडीने लागू करावी यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०१-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

उद्योग ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक १०/०८/२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन दर सुधारीत केले आहे. तथापी, उद्योग ऊर्जा व कामगार विभागामार्फत किंवा या विभागामार्फत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना याबाबत कोणत्याही लेखी परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या नाहीत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी वार्षिक उत्पनाची मर्यादा वाढविण्याबाबत

**(३) १६००८ (२९-१२-२०२२) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी रुपये अडीच लाख वार्षिक उत्पन्न मर्यादा असून अत्यल्प उत्पन्न मर्यादेमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य शासनाने निर्णय घेऊन तसेच केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये आठ लाख करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) १७१०९ (२५-०३-२०२३) श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १०५६३ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी निवृत्त होत असून शहराचा विस्तारात वाढ होत असल्याने अपुऱ्या कर्माचाऱ्यांमुळे महानगरपालिकेचा कारभार सांभाळतांना कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी नवीन आकृतीबंधानुसार पदाची संख्या ५२०२ झाली असून त्यापैकी २९६५ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत तर विविध संवर्गातील २२३७ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी शासनाने मान्य केलेल्या आकृतीबंधानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा ५७१६ पदांचा आकृतिबंध मंजूर केला आहे.

(३) दिनांक १५ फेब्रुवारी,२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा ५७१६ पदांचा आकृतिबंध मंजूर केलेला आहे. त्यामध्ये नवीन पदे मंजूर करण्यात आलेली असून बहुतांश पदांमध्ये वाढ वा बदल झाल्याने सदर पदांची नवीन बिंदू नामावली नोंदवही तयार करण्यात आलेली आहे. गट-अ व गट-ब संवर्गातील पदांची बिंदू नामावली नोंदवही तपासणीसाठी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आली असता सामान्य प्रशासन विभागाकडून त्यामध्ये काही त्रुटी प्राप्त झाल्या आहेत. सदर त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील आवश्यक (१५) पदांची बिंदू नामावली नोंदवही मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून तपासणी करुन प्राप्त झालेली आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-क संवर्गातील मंजूर पदांपैकी १२३ पदे नामनिर्देशनाने भरण्याकरीता आस्थापना खर्चाच्या ३५% मर्यादेची अट एक वेळची बाब म्हणून शिथिल करण्यास शासन पत्र दिनांक १४ फेब्रुवारी,२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरतांना स्पर्धा परीक्षा प्रक्रिया, TCS-ION व IBPS कंपनीमार्फत ऑनलाईन पध्दतीने (Computer Programme Based Test/ Examination) राबविणेबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार पदांची जाहिरात देणेबाबत संबंधित कंपनीशी महानगरपालिका स्तरावर पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये येणाऱ्या सर्व्हे नंबरच्या मालमत्ता कराची भरणा महानगरपालिकेकडे करण्यात येत नसल्याबाबत

**(५) १७१७३ (२५-०३-२०२३) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये येणाऱ्या सर्व्हे. नं.२६२ व २६३ इ. मध्ये मालमत्ता कर भरणा होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीमध्ये १९८८ मध्ये असलेले सर्व्हे. नंबर महानगरपालिका हद्दीत येत असतानाही तत्कालीन नगररचनाकार यांनी सदरील सर्व्हे. नंबर महानगरपालिकेमध्ये येत नसल्याचा निर्णय दिल्यामुळे महानगरपालिकेचा करोडो रुपयांचा महसूल बुडाला आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सर्व्हे. नंबर २६२ व २६३ इ. महानगरपालिका हद्दीमध्ये असताना सुध्दा महानगरपालिका हद्दीत येत नसल्याचा निर्णय देल्यामुळे सदरील सर्व्हे. नंबर हे नव्याने स्थापन झालेल्या काशी लिंगेश्वर या ग्रामपंचायतीमध्ये समावेश करण्यात आला असल्याने महानगरपालिकेचा करोडो रुपयांचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका सदरहू सर्व्हे. नंबर करीता बांधकाम परवानगी व सर्व सोयी सुविधा देत असूनही सदरहू सर्व्हे. नंबरचा मालमत्ता कराचा भरणा महानगरपालिकेत केला जात नसल्याबाबतच्या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

तत्कालीन नगररचनाकार, लातूर शहर महानगरपालिका यांनी तहसिलदार, लातूर यांनी दिलेल्या यादीतील सर्वे नंबर २६२,२६३ इ. हे हद्दी बाहेर असल्याबाबत कोणतीही शहानिशा न करता व आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांची मान्यता न घेता परस्पर कळविले.

त्यामुळे लातूर शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत काशी लिंगेश्वर नगर या भागातील मालमत्ता कर, पाणी कर, विकास शुल्क यामधून मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम झाला असल्याचे लातूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) लातूर शहर महानगरपालिकेने, काशी लिंगेश्वर नगर येथील लातूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील येणारे सर्वे नंबर दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे दिनांक २/०१/२०२३ रोजी सादर केला.

या प्रकरणी तत्कालीन नगररचनाकार, लातूर शहर महानगरपालिका यांच्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका च्या अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाहीकरीता विभागाद्वारे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घरकूल अनुदानात वाढ करण्याबाबत

**(६) १८०५१ (२५-०३-२०२३) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रामीण भागात प्रधानमंत्री घरकूल योजना राबविली जात असून सदर घरकुलाला मिळत असलेले अर्थसहाय्य कमी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घरकूलाचे अनुदान १ लक्ष ३० हजार असून साहित्याचे वाढते दर व महागाईमुळे अर्थसहाय्य कमी पडत असल्याने घरकूल धारक लाभार्थ्यांना आर्थिक भार सोसावा लागत असल्याचेहि निदर्शनास येते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडून सदर घरकूलांसाठी अनुदान वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०४-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना सर्वसाधारण क्षेत्रात रुपये १.२० लक्ष व डोंगराळ / नक्षलग्रस्त भागात रुपये १.३० लक्ष इतके अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.

(३) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात रुपये २.५० लक्ष वाढ करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे दिनांक २५/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०२/१२/२०२० च्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही, असे कळविले आहे. तद्नंतरही दिनांक ०१/०८/२०२२ रोजी पुन्हा केंद्र शासनाकडे अनुदान वाढीची मागणी केली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खरसई (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील खारभूमी बंधारा नादुरूस्त असल्याबाबत

**(७) १८१७८ (०२-०५-२०२३) श्री.जयंत पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक १३९६६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरसई (ता.म्हसळा,जि.रायगड) येथील पंचक्रोशीमधील खारभूमीलगत असलेल्या बनोटी, रेवली, आगरवाडा, गणेशनगर येथील खारभूमी बंधाऱ्याला सन १९९२ पासून ठिकठिकाणी भगदाड पडलेले असून सदर बंधारा नादुरूस्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खारभूमी बंधारा फुटल्याने मागील २० ते २२ वर्षापासून या भागात दुबार पीक घेणे पूर्णतः बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खारभूमी बंधाऱ्याला अनेक ठिकाणी भगदाड (खांडी) पडले असल्याने लागवडी खालील शेत जमिनीत समुद्राचे खारे पाणी शिरून सुमारे ६० एकर शेत जमीन नापीक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खरसई पंचक्रोशीमधील खारजमीन दुरूस्ती करून मिळावी म्हणून शेतकऱ्यांनी अनेक वेळा आंदोलने तसेच संबंधित विभागास अनेक वेळा लेखी निवदने देवून अद्यापपर्यंत सदर बंधाऱ्याची दुरूस्ती करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर खारभूमी बंधारा दुरूस्त करण्यासाठी व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अतिवृष्टी व उधाणामुळे बांधाला ठिकठिकाणी खांडी पडून शेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

(३) हे खरे आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

अतिवृष्टी व उधाणामुळे बांधास ठिकठिकाणी खांडी पडल्या आहेत. तसेच उघाड्याही नादुरुस्त झाल्या आहेत. त्यामुळे सदर योजनेचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सदर योजनेचे नुतनीकरणाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. परंतु दिनांक ०४/०३/२०२२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मापदंडात बसत नसल्याने अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर करण्यात आले नाही.

(५) योजनेचे नुतनीकरणाचे अंदाजपत्रक प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग यांचे दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील सूचनेनुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी कोंकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पाअंतर्गत खारभूमी योजनांचे प्रस्ताव सादर करण्याबाबत आदेशित केले होते, त्यानुसार या योजनेचे रुपये ७८८.६८ लक्ष किंमतीचे नुतनीकरणाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्यात आले आहे.

मदत व पुनर्वसन विभागाने मान्यता दिल्यानंतर सदर खारभूमी बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करण्याचे नियोजन असून शेतकऱ्यांचे नुकसान न होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

---

## जळगाव महानगरपालिकेअंतर्गत रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जलदगतीने पूर्ण करण्याबाबत

**(८) १८१९७ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १५२७२ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महानगरपालिका अंतर्गत रस्त्यांच्या कामांकरीता निधी उपलब्ध असूनही रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे रखडली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जळगाव महानगरपालिकेअंतर्गत रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जलदगतीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) व (२) जळगाव शहरातील महानगरपालिका हद्दीत अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठा पाईपलाईन व मलनिस्सारण योजना भुयारी गटार योजना पूर्णत्वास आल्या नंतर शासन निधीतून व मनपा निधीतून काही रस्त्यांची कामे देखील पूर्ण झाली आहे व काही कामे प्रगतीपथावर आहे. रस्ते नुतनी करणा करीता जिल्हा वार्षीक योजनेंतर्गत नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियाना अंतर्गत तसेच दलीत वस्ती सुधार योजनेंतर्गत ८५ पैकी ७१ रस्त्यांचे नुतनीकरणाचे कामे पूर्ण करण्यात आलेली असून १४ कामे प्रगतीपथावर आहे. तसेच शासनाने मंजूर केलेल १०० कोटी अनुदानापैकी ४२ कोटी मात्रच्या कामाच्या अंदाजपत्रकांना मान्यता देवून त्या अनुषंगाने ३८ कोटी मात्रच्या कामांचा मक्तेदार यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव हे कार्यन्वीयीन यंत्रणा म्हणुन असल्याने मंजूर निधी अंतर्गत ४९ रस्त्यांची कामे हाती घेण्यात आलेली असून त्यांच्या

मार्फत कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यापैकी काही कामे पूर्ण झालेली असून काही कामे प्रगती पथावर आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक ०५/०४/२०२३ अन्वये रक्कम रुपये १०० कोटी निधी जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील विविध प्रभागातील ४२ रस्त्यांच्या कामे नुतनीकरण करण्याकरीता मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर रस्त्याची कामे करणे करीता कार्यान्वयन यंत्रणा सार्व. बांधकाम विभाग असल्याने त्यांच्या मार्फत ४२ कामांचे अंदाजपत्रके तयार करुन शासन मान्यतेची कार्यवाही मनपा मार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिका अंतर्गत खडका रोडवरील सुभाष पोलीस चौकी जवळील नाल्यावरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(९) १८२०६ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिका अंतर्गत खडका रोडवरील सुभाष पोलीस चौकी जवळील नाल्यावरील पुलाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुलाच्या कामासाठी निधी उपलब्ध करून पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही,

भुसावळ नगरपरिषदेमार्फत सुभाष पोलीस चौकीजवळील नाल्यावर सन २००९ मध्ये पुल बांधण्यात आला असून, सद्य:स्थितीत सदर पुल सुस्थितीत आहे.

तथापि, खबरदारीचा उपाय म्हणून, सदर पुलाचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव यांना मुख्याधिकारी, भुसावळ नगरपरिषद यांच्या दिनांक २८ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील चेंबूर येथील बालसुधारगृहातून सात मुले बेपत्ता झाल्याबाबत

**(१०) १८२६० (२५-०३-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबुरच्या बालसुधारगृहातून सात मुले बेपत्ता झाल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे (०५-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून संस्थेमध्ये सुरक्षा व्यवस्था योग्य नसल्याचे आढळून आले. त्यानुसार सदर संस्थेकडून खुलासा मागविण्यात आला आहे. संस्थेतून निघून गेलेल्या बालकांपैकी २ बालके सापडली असून बाल कल्याण समिती, मुंबई उपनगर यांच्या आदेशान्वये सदर २ बालकांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. उर्वरित बालकांचा शोध घेण्यात येत आहे.

सदर संस्थेने सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी तीन सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केलेली आहे. सुरक्षा भिंतीवर तारेचे कुंपण लावण्यात आले आहे. संस्थेत सी.सी.टि.व्ही. ची संख्या वाढवण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## अनुदानित तंत्र शिक्षण संस्यांमधील कर्मचाऱ्यांना शासकीय अनुदानातून वेतन व भत्ते मिळण्याबाबत

**(११) १८२८० (२५-०३-२०२३) श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५३४४ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यापीठ संलग्नित अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र आणि शिक्षण व युवा सेवा विभाग यांना दिनांक १८ मे, १९७८ मधील नियम क्र.२,६,९ व ११ या शासन निर्णयान्वये अनुदान मूल्यनिर्धारण तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयातील नियम क्र.२ नुसार संपूर्ण खर्चाची जबाबदारी केवळ शासनाचीच असताना तसेच नियम क्र.९ नुसार संस्थेच्या अंदाजपत्रकातील मान्य खर्चाच्या १० टक्के तुलना प्रत्यक्षात झालेल्या सुटीसोबत पडताळून घेणे अपेक्षित आहे व नियम क्र.११ नुसार संस्थेच्या आर्थिक मंडळाने मंजूर केलेल्या व व्यवस्थापकिय मंडळाने मान्य केलेले अंदाजपत्रक अनुदानाचे मूल्यनिर्धारण करुन अनुज्ञेय अनुदान निश्चित करतांना अंतिम मूल्यनिर्धारण अहवालात विचारात घेण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ नंतर त्यांच्या बँक खात्यात पूर्ण वेतन जमा होत नसल्याबाबत गती इवेब या संघटनेने तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डॉ. नंदनवार, सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र तसेच तंत्रनिकेतन संस्थामधील कर्मचाऱ्यांना एचटीई सेवार्थ प्रणाली लागू होण्यापूर्वी पूर्ववत संपूर्ण वेतन अदा

होण्याच्या दृष्टीने एक समिती गठीत करून विविध उपाय सुचविणारा स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल समितीने शासनास सादर केला असून १०० टक्के अनुदान अदा करण्याबाबतची विसंगती दूर करण्याची शिफारस करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, तंत्र शिक्षण संचालनालयाव्दारे संस्थाचा अंतिम मूल्यनिर्धारण, अहवाल दिनांक १८ मे १९७८ नुसार तयार करणे अपेक्षित असतानाही दिनांक ४ सप्टेंबर, १९९९ रोजीच्या शासन निर्णयाला वित्त विभागाची सहमती नसतानाही नियम क्र. ६ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने बदल केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजीच्या सेवार्थ प्रणाली लागू करण्याच्या शासन निर्णयात परिच्छेद क्र.१० मधील विसंगती दूर करण्यासाठी शुध्दीपत्राचा प्रारूप मसुदा समितीने दिला असून तसेच अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०० टक्के अनुदान लागू करण्याबाबत कोणती उपाययोजना/ कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) लागू नाही.
(३) हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) हे खरे नाही.
(६) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती व समितीचा अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयाने शासनास सादर केलेला आहे. प्रस्तुत अहवालानुसार ९० टक्के ऐवजी १०० टक्के अनुदान देणेबाबत शिफारस केली होती. तथापि, अनुदान देण्याबाबतचे शासनाचे पूर्वीचे धोरण अद्याप कायम आहे.
(७) विभागाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, १९७७ व दिनांक १८ मे, १९७८ रोजीच्या शासन निर्णयातील अनुदान सुत्राप्रमाणे तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थांना एचटीई सेवार्थ प्रणालीद्वारे २०१६ पासून अनुदान वितरीत करण्यात येत आहे. परिणामी २५ तंत्र शिक्षण संस्थांना सन २०१९-२० पर्यंतच्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार रुपये १०.२१ कोटी इतक्या निधीचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्याने या अनुदानाची वसूली करण्याचे निर्देश लोकलेखा समितीने दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## गृह विभागातील पोलिसांना सुधारित वेतन लागू करणेबाबत

**(१२) १८७३१ (२५-०३-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांश संवर्गाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन लागू केले असून गृह विभागातील पोलिसांना यापासून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पोलीस निरीक्षक व तहसिलदार ही दोन्ही पदे 'अ' वर्ग राजपत्रित असल्याने त्यांना समान वेतन व ग्रेड पे मिळणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व पोलीस हवालदार या पदांना सुध्दा महसूल विभागाप्रमाणे सुधारित वेतन श्रेणी अद्याप लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीसांना न्याय देऊन त्यांच्या वेतन श्रेणीत सुधारणा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (३१-०७-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

वेतन आयोगाच्या शिफारशी मधील त्रुटी दूर करण्यासंदर्भात राज्य वेतन सुधारणा समितीची स्थापना करण्यात येते. सदर समितीच्या कार्यकक्षेत वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे आणि वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत त्रुटी असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशीं करणे या बाबी अंतर्भूत असतात. त्यामुळे दोन भिन्न विभागातील कर्मचाऱ्यांचा कामाचा भार, वेतनातील समानता याबाबत देखील सदर समितीने तुलनात्मक अभ्यास करून त्रूटी दूर करण्याबाबत शिफारसी केल्यास त्यावर कार्यवाही करणे अभिप्रेत असते.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतन सुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री.के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. गृह विभागाने बक्षी समितीसमोर सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व पोलीस हवालदार या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबत समितीस प्रस्ताव सादर केला होता.परंतु या संवर्गांबाबत समितीने वेतनत्रुटींसंदर्भात शिफारस केलेली नाही.

राज्य वेतन सुधारणा समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊन, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी,२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयात एकूण १०४ संवर्गाना सुधारित वेतनस्तर मंजूर केले आहेत. त्यामध्ये गृह विभागातील १६ संवर्गाचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मीरा-भाईंदर, वसई – विरार पोलीस आयुक्तालयातील विविध रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(१३) १८७८९ (१९-०६-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर, वसई – विरार पोलीस आयुक्तालयात पोलीस अंमलदारांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सुमारे १ हजार ६० पदे रिक्त असल्याने गुन्ह्यांच्या तपासामध्ये अडचणी येत असल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या अतिरिक्त कामाच्या ताणामुळे या ठिकाणी काम करणाऱ्या पोलिसांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि मीरा-भाईंदर, वसई – विरार पोलीस आयुक्तालयातील विविध रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पोलीस शिपाई भरती-२०२१ मध्ये मीरा-भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत ९८६ पोलीस शिपाई व १० पोलीस चालक अशी एकूण ९९६ पोलीस शिपायांची पदे भरण्यात आली आहेत. मीरा-भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालयातील मंजूर पदसंख्या ३३८० असून त्यापैकी सद्यःस्थितीत ३२७६ इतकी पदे भरलेली असून व १०४ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचे प्रमाण ३ टक्के इतके आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तरंदळे बौध्दवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्यावरील पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याबाबत

**(१४) १८७९५ (२२-०६-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तरंदळे बौध्दवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्यावर समाजकल्याण निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याचे दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुलाच्या दोनही बाजूस रस्त्याचे काम करणे आवश्यक असतानाही रस्त्याची कामे अद्यापही करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुषंगाने सदर पुलाच्या दोन्ही बाजूस रस्त्याची कामे न करणाऱ्या व सदर पुलाचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू रस्त्याचे व पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
सदर साकव व जोडरस्ते सुस्थितीत आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरेगांव, खटाव (जि.सातारा) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध योजनेंतर्गत करण्यात आलेली रस्त्यांची व पुलांची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(१५) १८८२४ (०४-०८-२०२३) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोरेगांव (ता.खटाव जि.सातारा) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध योजनेंतर्गत रस्त्यांची व पुलांची कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयात रस्त्यांची व पुलांची किती कामे सुरु आहेत व केव्हापासून तसेच या रस्त्यांच्या व पुलांच्या बांधकामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे व बांधकामांची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, या कामांपैकी बरीच कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,चौकशीच्या अनुषंगाने संबंधित रस्त्यांच्या व पुलांची निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत विविध योजनेंतर्गत रस्त्यांची व पुलांची एकूण ५१ कामे चालू असून सदर कामांवर रुपये २४२०.५९ लक्ष एवढा खर्च झालेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा, वाशिम व अकोला जिल्ह्यासाठी स्वतंत्र संत गजानन महाराज शेगाव विद्यापीठ सुरु करण्याबाबत

**(१६) १९२४७ (०४-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा, वाशिम व अकोला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सोयींचे व्हावे यासाठी उक्त तीन जिल्ह्यासाठी एक स्वंतत्र " संत गजानन महाराज, शेगांव विद्यापीठ " सुरु करण्याची मागणी स्थानिक जनतेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संत गजानन महाराज, शेगाव विद्यापीठ सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही, तथापि, अशा आशयाचा ठराव, सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात प्राप्त झाला होता.
(२) संत गाडगेबाबा महाराज अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे शैक्षणिक कामकाज योग्य पध्दतीने सुरू आहे. विद्यापीठात शिक्षक व शिक्षकेतर पदांची मंजूर संख्या पुरेश्या प्रमाणात आहे. नवीन उपपरिसर निर्मिती करण्यासंदर्भात धोरण निश्चित करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील एकच गट असलेल्या ग्रामपंचायतीची गावे त्याच तालुक्यातील पंचायत समितीला जोडण्याबाबत

**(१७) १९३८१ (०८-०८-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील तालुका विभाजनामुळे एकच गट ग्रामपंचायत गावापैकी एक गाव एका तालुक्यात तर दुसरे गाव दुसऱ्या तालुक्यात अशी २१ गावांची पंचायत समिती तालुक्यांमध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गट ग्रामपंचायतींमधील गावे त्याच तालुक्यातील पंचायत समितीला जोडण्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने मा.पालकमंत्री चंद्रपूर यांच्याकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील गट ग्रामपंचायतींमधील गावे त्याच तालुक्यातील पंचायत समितीला जोडण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (११-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) गट ग्रामपंचायती मधील गांवे त्यांच तालुक्यातील पंचायत समितीला जोडण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांना ग्रामपंचायतीचे ठरावासह प्रस्ताव सादर करणेबाबत जिल्हा परिषदेने कळविले आहे.

---

## राज्यातील तपासणी झालेल्या २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या ७८ पारंपरिक वरिष्ठ महाविद्यालयांना १००% अनुदान देणेबाबत

**(१८) २०४५९ (०४-०८-२०२३) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या तपासणी झालेल्या ७८ वरिष्ठ महाविद्यालयांना १००% अनुदान मिळत नसल्याने कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालय-विद्याशाखांना अनुदान देण्याबाबत यापूर्वी अनेक प्रस्ताव सादर केले असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वी कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०२१ रोजी शिक्षण सहसंचालक, महाराष्ट्र राज्य यांना पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) दिनांक २४/११/२००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालय/विद्याशाखांना अनुदान देणे विषयी अहवाल सादर करण्याबाबत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक ०८/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य यांना कळविले आहे.
(३) दिनांक २४/११/२००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या महाविद्यालयांना/ विद्याशाखांना १००% अनुदानावर आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रोफेसर या पदावर नियुक्त प्राध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्याबाबत.

**(१९) २०५१० (०४-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च महाविद्यालयात नियुक्त असलले प्राध्यापक (प्रोफेसर ग्रेड)(AL-१४) आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य ही पदे यु.जी.सी. व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार एकाच दर्जाची पदे आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीमध्ये प्राचार्याचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे व प्रोफेसरांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे ही बाब नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार अनुसरुन नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रोफेसरांच्या सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे पर्यंत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :** (१) व (२) राज्यातील अकृषी विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार पदवी महाविद्यालयातील (Under Graduate) प्राचार्यांना सहयोगी प्राध्यापक समकक्ष वेतन (ॲकॅडेमीक लेव्हल १३-ए) तसेच पदव्युत्तर महाविद्यालयातील प्राचार्यांना प्राध्यापक समकक्ष वेतन (ॲकॅडेमीक लेव्हल १४) लागू करण्यात आले आहे.

अकृषी विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्याचा आणि उर्वरित अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. तसेच प्राचार्यांना ६२ व्या वर्षानंतर ६५ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे तथापि, ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागातील पात्र प्राचार्यांची कमतरता असल्याची बाब लक्षात घेता, अशा प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय सरसकट ६५ वर्षे करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खामगाव (जि.बुलढाणा) शहर आणि परिसरात तेलबिया तसेच धान्याची विनापरवानगी साठवणूक केली जात असल्याबाबत

**(२०) २०६१६ (०४-०८-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलढाणा) शहर आणि परिसरात पुरवठा विभागाची कोणतीही परवानगी न घेताच तेलबिया तसेच धान्याची साठवणूक केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खामगाव एमआयडीसीमध्ये बंद पडलेल्या उद्योगांचे गोदामे तसेच शहरा नजिकच्या खेड्यांमध्ये तात्पुरत्या स्वरूपाच्या गोदामांमध्ये तेलबिया तसेच धान्याची साठेबाजी केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यापारी शेतकऱ्यांकडून कमी भावाने धान्य घेऊन धान्याची साठवणूक करुन नफेखोरी करत असूनही पुरवठा विभागाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांसह ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांकडून कमी भावाने घेतलेल्या धान्याची साठवणूक करुन नफेखोरी करणाऱ्या संबंधित दोषी व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (३१-०८-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

खामगाव, जि.बुलढाणा शहर आणि परिसरात पुरवठा विभागाची कोणतीही परवानगी न घेताच तेलबिया तसेच धान्याची साठवणूक केली जात असल्याचे माहे एप्रिल २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही. राज्यात सोयाबिनचे जास्त प्रमाणात उत्पादन झाल्याने त्याच्या बाजार दरात घट झाल्याने शासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, या दृष्टीकोनातून सोयाबिनला साठा निर्बंधातून दिनांक ०५/११/२०१६ पासून वगळण्यात आलेले आहे. महाराष्ट्र घाऊक व्यापार आदेश २०१५ च्या नियम ३ नुसार सोयाबिनच्या व्यापारासाठी परवाना घेण्याची आवश्यकता नाही.

(३) व (४) जास्त प्रमाणात दरवाढ होऊ नये यासाठी केंद्र शासनाच्या दिनांक ०२ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार तूर व उडद डाळींचे घाऊक/ किरकोळ व्यापारी तसेच मिलर्स/इम्पोटर्सकरीता साठा निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सदर डाळीकरीताचे साठा निर्बंध दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ पर्यंत लागू राहणार आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या दिनांक १२ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार गव्हाच्या घाऊक/किरकोळ व्यापारी, बिग चेन रिटेलर्स, प्रोसेसर्स साठ्यावरील निर्बंध हे दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत लागू राहणार आहेत. तसेच, साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्याच्या संबंधित यंत्रणांना सुचना देण्यात आल्या असून, केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्देशानुसार राज्य शासनाच्या पुरवठा यंत्रणेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.